# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७ / चैत्र १, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३)** | **कृषी आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### पुणे-बंगरुळ महामार्गावरील पुणे-सातारा या टप्प्याचे सहापदरीकरणाचे काम पूर्ण करुन कागल-सातारा दरम्यान टोप येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(१) * ७७९८८ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वरील पुणे-सातारा रस्त्याच्या सहापदरीकरणाच्या कामाला सहा वर्षापूर्वी सुरुवात झाली असून सदर काम अत्यंत धीम्यागतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे-बंगरुळ महामार्गावरील कागल-सातारा या १३३ कि.मी. मार्गाच्या सहापदरीकरण कामाचा नियोजित आराखडा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या अधिकारी व अभियंत्यांनी पुणे येथे दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास पार पडलेल्या बैठकीत मा.मंत्री, रस्ते, वाहतूक व महामार्ग, भारत सरकार यांच्यासमोर सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामार्गावरील कागल-सातारा या टप्प्यामध्ये अपघातप्रवण टोप या ठिकाणी भुयारी मार्ग व हवाई पादचारी पूल प्रस्तावित असून टोप हे अपघातप्रवण क्षेत्र असल्याने या ठिकाणी उड्डाणपूलाची मागणीही गावकऱ्यांनी संबंधितांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्गावरील पुणे-सातारा या टप्प्याचे सहापदरीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याबाबत व कागल-सातारा या दरम्यान टोप येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत तसेच पुणे-सातारा या टप्प्यातील महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामास विलंब लावणाऱ्या संबंधितांविरूद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत पुणे- सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाचा प्रकल्पाचे बांधकाम दि.०१.१०.२०१० पासून प्रगतीत आहे.

(२) मा.मंत्री, रस्ते, वाहतूक व महामार्ग, भारत सरकार यांनी दि.१४.०८.२०१६ रोजी पुणे येथे घेतलेल्या आढावा बैठकीत सदर प्रकल्पाचे सादरीकरण सादर करण्यात आले हे खरे आहे.

(३) व (४) कागल सातारा सहापदरीकरण प्रकल्पाच्या प्रारुप सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये टोप येथे उड्डाणपूल प्रस्तावित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(५) पुणे-सातारा हया महामार्गाचे सहापदरीकरणाच्या प्रकल्पामधील भूसंपादनामधील अडचणी, झाडे तोडण्यासाठी परवानगी, वन विभागाकडून परवानगी, सेवा वाहिन्यांचे स्थलांतर अशा विविध बाबीस विलंब व सवलतकाराकडून धीम्या गतीने होणारे काम हयामुळे काम रेंगाळले होते.

सातारा कागल हया महामार्गाचे सहापदरीकरणाचा प्रकल्प केंद्रशासनाकडे मंजुरीस्तरावर आहे असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आडारी व झिरंगा नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत**

**(२) * ७३८२१ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील विरण, बेलाची वाडी, डांगमोडे या मुख्य रस्त्यावरील बेलाची वाडी प्राथमिक शाळेजवळील छोटा पूल अरूंद असून त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढीस लागल्याने सदर पूलाचे रूंदीकरण तसेच संपूर्ण रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे म्हणून तेथील ग्रामस्थांनी गत तीन वर्षापासून उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, मालवण, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली/सावंतवाडी, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग तसेच मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील आडारी पूलाची अनेक वर्षापासून निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्याने सदरहू पूल वाहतुकीस अत्यंत धोकादायक झालेला असतांनाही पूल वाहतुकीस योग्य असल्याचा शासनाने दाखला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे गडमढ (राऊतवाडी) (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) आणि मौजे कासार्डे (साटमवाडी) (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या दोन वाडयांमधून वाहणाऱ्या झिरंगा नदीवरील कॉजवे बांधून आजमितीस जवळजवळ ३० ते ३२ वर्षे झालेली असून कॉजवेच्या वरच्या पृष्ठभागावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडून तो नादुरुस्त होवून धोकादायक झालेला असल्याने नादुरुस्त कॉजवे ऐवजी मोठा पूल बांधण्यात यावा यासाठी त्या परिसरातील ग्रामस्थांनी गत अनेक वर्षापासून मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा,

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आडारी व झिरंगा नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत तसेच बेलाची वाडी येथील प्राथमिक शाळेजवळील छोट्या पुलाचे रुंदीकरण करून संपूर्ण रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रत्यक्ष पहाणीवरुन कॅाजवे सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) आडारी नदीवरील पूलाच्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे. व झिरंगा नदीवरील नवीन पुल निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रयत्न राहिल.

तसेच बेलाची वाडी येथे छोटा पूल नसून त्याठिकाणी पाईप मोरी आहे. त्याचे व खराब रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मुरूड (ता.मुरुड, जि.रायगड) बंदरावर मच्छिमार जेट्टी व कोल्ड स्टोरेज उपलब्ध नसल्याबाबत

**(३) * ७६५६२ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (ता.मुरुड, जि.रायगड) बंदरावर मच्छिमारांना नौका लावण्यासाठी व मच्छी उतरविण्यासाठी जेट्टी उपलब्ध नसल्याने एकदरा पुलावरून मच्छिमार बांधवांना बर्फ बोटीवर आणावा लागतो तसेच किनाऱ्यावर मासळी साठविण्यासाठी शीत गृह (कोल्ड स्टोरेज) नसल्यामुळे मच्छिसाठी लागणारा बर्फ बाहेरुन आणावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने मुरुड बंदरावर मच्छिमार जेट्टी बांधण्याबाबत व कोल्ड स्टोरेज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) होय.

(३) रा.कृ.वि. योजना सन २०११-१२ अंतर्गत मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे मच्छिमारांसाठी मासे उतरविण्यासाठी मुलभूत सुविधा पुरविणे व जेट्टीचे बांधकाम करण्यासाठी शासन निर्णय क्र. मत्स्यवि-२०११/प्र.क्र.२८७/पदुम-१४, दि.१५.१२.२०११ अन्वये रु.१७८.४९ लक्ष इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास व आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बांधकाम प्रगतीपथावर आहे. केंद्र शासनाच्या नीलक्रांती योजना, रासविनि मार्फत बर्फ कारखाने उभारण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येतो. मुरुड किनाऱ्यावरील कार्यरत क्रियाशील मच्छिमार किंवा मच्छिमार सहकार संस्था यांच्याकडून बर्फ कारखाने उभारणीचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांना गारपिटीचे प्रलंबित अनुदान मिळण्याबाबत

**(४) * ७९९८७ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील ६५ शेतकऱ्यांना सन २०१३-१४ या वर्षी झालेल्या गारपिटीचे मंजुर असलेले अनुदान केवळ बँकेच्या खाते क्रमांक व नावांमधील छापील चुकींमुळे तीन वर्षापासून मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(५) * ८२६६० श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील रत्नागिरी जिल्हयात तापमानातील फरक व थंडीचा परिणाम आंबा या फळावर झाल्याने ८० टक्के मोहर गळून गेल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रत्नागिरीतील आंबा उत्पादक शेतकरी अडचणीत असून केवळ १० टक्के मोहोराला झालेल्या फळधारणेवर बागायतदार अवलंबून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून पाहणी करून पंचनामा करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यात तापमानातील फरक व थंडीचा परिणाम आंबा या फळावर झाल्याने ८० टक्के मोहोर गळून गेल्याची बाब फेब्रुवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आली नाही. माहे ऑक्टोबरच्या अखेरच्या आठवड्यापासून माहे जानेवारी, २०१७ पर्यंत टप्प्या-टप्प्याने मोहोर येण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे.

यावर्षीच्या हंगामामध्ये सर्वसाधारणपणे आंबा झाडाला मोहोर येण्याची प्रक्रिया १५ ते २० दिवस उशिरा सुरु झाली असून आंबा पिकासाठी पोषक हवामान असल्याचे दिसून आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे-वसई (जि.ठाणे) खाडी किनाऱ्यावरील काल्हेर परिसरातील शासकीय व खाजगी जमिनीवर अनधिकृत बांधकामे केल्याबाबत**

**(६) * ८२३४३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-वसई (जि.ठाणे) खाडी किनाऱ्यावरील काल्हेर परिसरातील शासकीय व खाजगी जमिनीवरील खारफुटी वनस्पती नष्ट करुन सदर जागेवर भराव टाकण्याचे काम भूमाफिया करीत असल्याबाबतच्या तक्रारी सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी,ठाणे व राज्य खारफुटी कक्ष यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील बाळकुम, कशेळी, काल्हेर येथील शासकीय जमिनीवरील तिवरांच्या झाडांची तोड करुन मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खारफुटी वनांचे व तिवरांचे संरक्षण करून शासकीय व खाजगी जमिनीवर होणारे अतिक्रमण रोखण्याबाबत व खारफुटी वनस्पती नष्ट करणाऱ्या भूमाफियांवर तसेच तिवरांच्या झाडांची तोड करुन अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालानुसार, तिवरांच्या झाडाची तोड करून अनधिकृत भराव केल्याबाबत संबंधितांविरूद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये संबंधित पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(७) * ७६५४० श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील पंढरपूर ते सुस्ते रस्ता प्रजिमा-६६, बादलेवाडी-ढवळस- कव्हे रस्ता प्रजिमा-१५, तुळशी ते प्रमुख राज्यमार्ग जोडरस्ता प्रजिमा-१०५, दहिवली ते निमगाव(टें.) रस्ता प्रजिमा-१०५, केम- उपळवाटे ते दहिवली रस्ता प्रजिमा-४, भुताष्टे- चिंचोली ते माढा रस्ता प्रजिमा-१७, वाकाव- विठ्ठलवाडी ते उपळाई (बु.) रस्ता प्रजिमा-१९, सुलतानपूर ते जामगाव रस्ता प्रजिमा-१२१, आलेगांव (खु.) गारअकोले ते टाकळी रस्ता प्रजिमा-१२८, माळखांबी- जांभूड-नेवरे- कोंढारपट्टा ते उंबरे (वे.) प्रजिमा-९२ हे रस्ते देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांवर मोठे खड्डे पडले असून काही रस्त्यांचे खडीकरण देखील झालेले नसल्यामुळे वारंवार अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावरून वाहतूक करताना विद्‌यार्थी, रूग्ण, सामान्य नागरिक यांना त्रास सहन करावा लागत असल्यामुळे सर्व स्तरातून रस्ते दुरुस्तीची मागणी करण्यात आली असून स्थानिक लोकप्रतिनिधीनींही शासनाकडे सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रस्त्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) प्रश्नांकित रस्त्यांच्या लांबीपैकी काही लांबीत रस्ते मोठ्या प्रमाणात क्षतिग्रस्त झाले आहेत. या लांबीमध्ये रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याची कामे करणे आवश्यक आहे. तथापि या क्षतिग्रस्त लांबीतील रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाची दुरुस्ती करुन रस्ते वहातूकीसाठी सुरळीत ठेवण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) होय.

(४), (५) व (६) प्रश्नांकित रस्त्यांच्या लांबीपैकी क्षतिग्रस्त लांबीत रस्त्याच्या मजबूतीकरण व डांबरीकरणाची कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**हेदवली-बोरवाडी व समृध्दीवाडी-कातकरीवाडी (ता.मुरबाड, जि.ठाणे) या रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(८) * ८०१४९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेदवली-बोरवाडी व समृध्दीवाडी-कातकरीवाडी (ता.मुरबाड, जि.ठाणे) या रस्त्यांचे काम भावेश कन्स्ट्रक्शन, खालापूर यांना माहे डिसेंबर, २०१२ मध्ये दिल्याचे कागदोपत्री दाखवून शाखा अभियंता व उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी समृध्दीवाडी नावाची वाडी मूळ रेकॉर्डवर अस्तित्वात नसतानांही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेकॉर्डवर दाखविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त दोन्ही रस्त्यांची कामे न करता देयके काढून करोडो रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या शाखा अभियंता व उप अभियंता यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांचे ठिबक आणि तुषार सिंचन संचाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(९) * ७६४४० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २५ जिल्हयातील बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी सुक्ष्म सिंचन (ठिबक आणि तुषार सिंचन) संच बसविण्यासाठी सन २०१३-१४ मधील गत दोन वर्षामधील सुमारे १८५ कोटी रुपयांचे अनुदान शासनाच्या दुर्लक्षीतपणामुळे रखडले असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात जिल्हा कृषी अधिकारी या कार्यालयाकडून ठिबक सिंचन योजना मंजूर होऊनही सदर योजनेअतंर्गत सुमारे १३ कोटी रुपयांचे अनुदान अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात सन २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षात तुषार व ठिबक सिंचन योजनेकरीता २४०५ शेतकऱ्यांनी पैसे खर्च करूनही अद्यापपर्यंत सदरहू योजनेचा लाभ मिळाला नसल्याने उक्त शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने निधीची तरतूद करून प्रलंबित अनुदान शेतकऱ्यांना वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) सन २०१३-१४ मधील रु.१२६ कोटी व सन २०१४-१५ मधील रु.५२ कोटी असे एकूण रु.१७८ कोटी एवढ्या रक्कमेचे पूर्वसंमती दिलेल्या प्रस्तावांचे अनुदान प्रलंबित आहे.

(२) उस्मानाबाद जिल्हयातील सन २०१३-१४ या वर्षातील पूर्वसंमती दिलेल्या ३३२१ लाभार्थ्यांचे रु.१०.५४ कोटी एवढ्या रक्कमेचे अनुदान प्रलंबित आहे.

(३) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षातील पूर्वसंमती दिलेल्या प्रस्तावांचे अनुदान प्रलंबित नाही.

(४) व (५) निधी उपलब्धतेनुसार शेतकऱ्यांचे पूर्वसंमती दिलेल्या प्रस्तावांचे अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळच्या एस.टी. सहकारी बँकेत संगणक खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१०) * ७७०६५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परीवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना बँकिंग सेवा पुरविणाऱ्या एस.टी. सहकारी बँकेत ३०० संगणक कागदोपत्री खरेदी केल्याचे दाखवून प्रत्यक्षात १२० संगणक खरेदी करून आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्‌नुसार बँकेच्या दोषी संचालकांविरूध्द सहकार कायदा कलम ८३ व ८८ अन्वये विहित कालावधीत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) बँकेच्या संचालकाने केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई-१ यांनी केलेल्या चौकशी मध्ये गैरव्यवहाराबाबत कोणतेही तथ्य

आढळून आलेले नाही. बँकेच्या संचालक मंडळाने निर्णय घेऊन जाहिरातीव्दारे संगणक पुरवठादाराची नियुक्ती केली आहे. तसेच सदर प्रक्रियेबाबत रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अहवालामध्ये तसेच वैधानिक लेखापरीक्षण अहवालामध्ये कोणतेही आक्षेप नोंदविलेले नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील रामवाडी बसस्थानकाची झालेली दुरवस्था**

**(११) * ७९५८८ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील रामवाडी बसस्थानकाची इमारत धोकादायक झाली असून इमारतीच्या पिलर व स्लॅबमधील प्लास्टर निखळल्यामुळे त्यामधील लोखंड बाहेर आल्याने इमारत कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसस्थानकाची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार उक्त प्रकरणी जबाबदार असलेल्या संबंधितांवर कारवाई करुन बस स्थानाकाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील रामवाडी बसस्थानकाची इमारत जुनी झालेली आहे. परंतु धोकादायक स्थितीत नाही.

(२) व (३) रामवाडी बसस्थानकाची पाहणी करण्यात आलेली असून, आवश्यक ती डागडूजी सत्वर करण्याची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील अवैध गौणखनिज उत्खननासाठी आकारण्यात आलेल्या दंडाच्या वसुलीबाबत

**(१२) * ८२३८८ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अवैध गौणखनिज उत्खाननाबाबत गत दोन वर्षात आकारण्यात आलेल्या रुपये ६४ कोटी, ६४ लाखांच्या दंडाची वसुली अद्यापही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दंडाची रक्कम अद्यापही शासनाने वसुल न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत व विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) माहे जानेवारी, २०१६ मध्ये अकोला जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणांनी विविध विकास कामांकरीता वापरण्यात आलेल्या गौणखनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम शासनास भरणा केली आहे किंवा कसे, याबाबत तपासणी मोहिम राबवण्यात आली होती. सदर तपासणीमध्ये एकूण १३०४ प्रकरणांमध्ये स्वामित्वधन शुल्काचा शासनाकडे भरणा न करता कंत्राटदारांना देयकाची अदायगी करण्यात आल्याचे आढळून आल्याने, संबंधितांविरूध्द दंडनिय कारवाई करून एकूण रू. ६४,६४,९३,८४४/- एवढ्या दंडाच्या रकमेचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

त्यापैकी रू.२२.६९ कोटी दंडात्मक रकमेची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. उर्वरित प्रकरणांमध्ये संबंधित कंत्राटदारांच्या देयकांमधून दंडाची वसुली करण्याबाबत संबंधित यंत्रणांकडे आदेश पाठविण्यात आले असून, वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुद्रांक शुल्क बुडविणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत**

**(१३) * ७६०५१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मुद्रांक शुल्क विभागाला २३ हजार ५४८ कोटी रुपये महसुलाचे उद्दिष्ट देण्यात आले असताना माहे, डिसेंबर, २०१६ पर्यंत केवळ १३ हजार ८३१ कोटी रुपये इतकाच महसूल जमा करता आल्यामुळे उर्वरित तीन महिन्यात १० हजार कोटी जमा करण्याचे लक्ष पूर्ण करण्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून मुद्रांक शुल्क बुडविणाऱ्या दोन हजार प्रकरणांची तपासणी सुरू करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बांधकाम व इतर व्यावसायिकांनी एक हजार कोटींहून अधिक रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडविले असून सदर प्रकरणातील ९० टक्के प्रकरणे ही बांधकाम व्यावसायिकांशी संबंधित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पुण्यातील ५०० कोटी, मुंबई आणि ठाण्यातील १ हजार कोटी तर उर्वरित महाराष्ट्रातील ५०० कोटी रुपयांच्या व्यवहारांची तपासणी करण्यात येत असून मुंबईतील एका बड्या बांधकाम व्यावसायिकाने सहाशे कोटी रुपयांचे शुल्क बुडवले असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने हजारो कोटी मुद्रांक शुल्क बुडवणाऱ्या बांधकाम व्यावसायिक व इतर यांच्या मालमत्ता जप्त करून व त्यांची बँक खाती गोठवून बुडीत मुद्रांक शुल्क वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मुद्रांक शुल्क विभागाला देण्यात आलेल्या रू. २३, ५४८ कोटी महसुलाच्या उद्दिष्टापैकी माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत १४,६७७. ६८ कोटी रूपये महसूल जमा करण्यात आला आहे.

उर्वरित महसूल उद्दीष्टाचे लक्ष पूर्ण करण्यासाठी विभागाकडून चुकविलेल्या मुद्रांक शुल्काच्या प्रलंबित प्रकरणांची तपासणी सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अतंर्गत लेखापरीक्षण व महालेखापाल लेखा तपासणीअंती लेखा आक्षेपांच्या अनुषंगाने तसेच महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३२अ, ३३, ३३अ, ४६, व ५३अ अतंर्गत मुद्रांक शुल्क वसुलीच्या प्रलंबीत प्रकरणांचा साप्ताहिक आढावा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावर घेऊन मुद्रांक शुल्काच्या वसूलीसाठी संबंधित पक्षकारांचे बँक खाते सिल करणे, त्यांच्या स्थावर/जंगम मालमत्तांची जप्ती करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. अशा प्रकरणांमध्ये बांधकाम व्यवसायकांशी निगडीत प्रकरणांचा ही समावेश आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वरील माळशेज घाटातील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१४) * ७४९९२ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-नगर या राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वरील माळशेज घाट रस्त्याला खड्डे पडले असून रस्त्यावर धोकादायक सुचना देणारे फलक नसून रस्त्याच्या साईडपट्ट्याही उखडलेल्या आहेत तसेच कोसळलेल्या संरक्षण भिंतीमुळे जागोजागी डांबराची पिंपे लाईनीत करुन सुरू केलेली एकेरी वाहतूक यामुळे माळशेज घाट वाहतूकीसाठी धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याणहून नगर-पुण्याकडे येण्या जाण्याचा माळशेज घाट हा एकमेव पर्याय असून दरवर्षी माळशेज घाटातील रस्ते दुरूस्तीसाठी कोट्यवधीचा खर्च होवूनही हा मार्ग कायम धोकादायक बनत असून दुर्घटना व अपघात

घडल्यास तात्काळ मदतीसाठी घाट परिसरात रूग्णवाहिन्या, अग्नीशमनदल, जेसीबी, गिर्यारोहक टीम, आरोग्य उपचार यंत्रणा या सोयी-सुविधा संदर्भात कोणतीच उपाययोजना नसून अपघात टाळण्यासाठी घाट परिसरात कुठलीच सुधारणा आजमितीस करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मार्गावर दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजी कठडा तोडून बस दरीत कोसळून ३५ जणांचा बळी गेला आहे तसेच या महामार्गाची वाहन चालक व प्रवाशांची सुरक्षितता याबाबींकडे दुर्लक्ष केल्यानेच या घाट रस्त्यावर अपघातांची दिवसेंदिवस वाढ झाली असून घाटात वर्षभर सुशोभिकरणाच्या कारणास्तव केल्या जाणाऱ्या ब्लास्टिकमुळे घाट ठिसूळ बनून कोसळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या घाटात दरड कोसळणे, रस्ते खचणे, रस्त्याला भेगा पडणे, अपघात नित्याचे असताना त्यातच रिलायन्स कंपनीने मोठमोठया केबल टाकण्यासाठी संरक्षण भिंतीलगत खोदकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाहतूकीसाठी धोकादायक झालेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वरील माळशेज घाटाची सुरक्षितता तसेच वाहनचालक व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी या घाट रस्त्याची सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग २२२ (नवीन ६१) वरील माळशेज घाटात एकूण ६० मी. लांबीमध्ये पिंप ठेऊन एकेरी वाहतूक सुरु असून रस्ते सुरक्षेच्या दृष्टीकोनामधून बाजूपट्ट्यांवर एकूण ३४० मी. लांबीमध्ये पिंप लावण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

माळशेज घाटामध्ये रस्ते सुरक्षेच्या दृष्टीकोनामधून दरीवरील व डोंगराच्या बाजूला आवश्यकतेप्रमाणे १३१० मी. लांबीच्या संरक्षक भिंती, ३ लहान पूलाचे रुंदीकरण/पुर्नबांधणी, १६ पाईप मो-यांचे रुंदीकरण, २० आवश्यक ठिकाणी तीव्र वळणांची सुधारणा व बोगदयाची कामे पूर्ण करण्याबरोबरच रस्त्याची रात्री दृष्यमानता वाढविण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला थर्मोप्लॅस्टिक पेंटींग व कॅट आईज बसविण्यात आलेले आहेत. दरड कोसळण्यास अटकाव होण्यासाठी घाटातील कडयावर १२०० चौ.मी. भागात बोल्टींग करुन जाळी बसविण्यात

आलेली आहेत. सदयस्थितीत १०० मी. संरक्षण भिंत, ३ पाईप मो-यांचे रुंदीकरण, ३ ठिकाणी तीव्र वळणाच्या सुधारणेचे काम प्रगतीत आहे.

या महामार्गावर अपघात झाल्यास १०८ क्रमांकावर रुग्णवाहिका उपलब्ध आहे. पावसाळयातील चार महिने माळशेज घाटात दरडी कोसळल्यानंतर तात्काळ काढून वाहतूक सुरु करण्यासाठी जेसीबी व इतर साधन सामुग्री कार्यरत असतो.

(३) माळशेज घाटामध्ये दि. २ जानेवारी, २०१४ मध्ये एस टी बस व खाजगी मालवाहू ट्रक यांच्या अपघातानंतर बस दरीत कोसळून २८ व्यक्ती मयत झाल्या हे खरे आहे.

तथापि २०१५ नंतर अपघात कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. गेल्या वर्षभरात घाटात सुशोभिकरणाचे कोणतेही काम केले नसल्याने त्याच्या ब्लास्टिकमुळे घाट ठिसूळ होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

माळशेज घाटामध्ये रस्ते सुरक्षाविषयक कामे टप्प्याटप्प्याने निधी उपलब्धतेनुसार दरवर्षी हाती घेण्यात येत असतात.

(४) हे खरे नाही.

मागील दोन वर्षात माळशेज घाटात रिलायन्स कंपनीच्या केबल टाकण्यास परवानगी दिलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) घाट परिसरात रस्ते सुरक्षेविषयक कामे टप्प्याटप्प्याने निधी उपलब्धतेनुसार दरवर्षी हाती घेण्यात येत असतात. तसेच कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून माळशेज घाटातील महामार्गाचे रुंदीकरण व बोगदा काढण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम भारतीय राष्ट्रीय राजामार्ग प्राधिकरण यांचेमार्फत प्रगतीत आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कोथळी (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील केळी उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई देण्याबाबत

**(१५) * ७९७७५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोथळी (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०१५-१६ मध्ये रूपये ६१४० रक्कमेचा भरणा करून फळ पीक विमा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेला वादळी पाऊस, माहे एप्रिल, २०१६ मध्ये झालेली गारपीट व माहे मे, २०१६ मध्ये ४६ अंशापर्यंत गेलेले तापमान इत्यादी नैसर्गिक बाबींमुळे केळी उत्पादकांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फळ पीक विमा घेणाऱ्या शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई देण्याबाबत संबंधीत विमा कंपनीकडून टाळाटाळ होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. राज्यात विमा पात्र शेतक-यांची संख्या ११८६७० आहे. त्यापैकी बुलढाणा जिल्हयात ३०५ शेतकरी विमा पात्र आहेत. त्यापैकी मोताळा तालुक्यातील ९ शेतकरी विमा पात्र आहेत.

(४) भारतीय विमा कंपनीने राज्यात रक्कम रु.१३९.५० कोटी इतकी नुकसान भरपाई अदा केलेली आहे. त्यापैकी बुलढाणा जिल्हयात ६१.१४ लाख व मोताळा तालुक्यात रक्कम रु.५७,७८८/- नुकसान भरपाई संबंधित शेतक-यांच्या बँक खात्यामध्ये दि.१३/१०/२०१६ रोजी भारतीय कृषि विमा कंपनीकडून जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## वानिवडे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील भटवाडी खारभूमी विकास प्रकल्प राबविण्याबाबत

**(१६) * ७६१०० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानिवडे (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील भटवाडी खारभूमी विकास प्रकल्प राबविण्यात यावा म्हणून शेतकऱ्यांनी मागील २५ वर्षापासून सातत्याने मा.खारभूमी विकास मंत्री, कार्यकारी अभियंता, खारभूमी विकास योजना, सिंधुदुर्ग, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २९ हेक्टर क्षेत्र पुनप्रस्तापित करणाऱ्या या खारभूमी विकास प्रकल्पाच्या कामास सन २००१ मध्ये मंजूरी देण्यात आलेली असतानाही अद्यापपर्यंत सदरहू योजनेचे काम सुरूच झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे तेथील शेतक-यांनी यापूर्वी उपोषणही केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू खारभूमी विकास प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही. वानिवडे खारभूमी योजना, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग ही योजना आहे. पुन:प्रापित क्षेत्र २६ हेक्टर आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) वानिवडे खारभूमी योजना, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## कोल्हापूर-सांगली महामार्गावरील बसवाण खिंड ते अंकली पूल दरम्यानच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१७) * ८१२१४ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-सांगली महामार्गावरील बसवाण खिंड ते अंकली पूल या दरम्यान तीन ते चार वर्षापासून सुरु असलेले रस्त्याचे काम अद्यापही अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर-सांगली राज्य मार्गावर प्रत्येक गावालगत व्यावसायीकांनी मिडल ओपनिंगचे निकष दुर्लक्षित करून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकाने, हॉटेल, पेट्रोल पंपासमोर रस्त्यांचे डिव्हायडर फोडून मिडल ओपनिंग केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर-सांगली राज्य मार्गावर व्यावसायीकांनी केलेल्या मिडल ओपनिंगमुळे गेल्या तीन वर्षात अपघात होऊन अनेकांचे बळी गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बसवाण खिंड ते अंकली पूल या दरम्यान सुरु असलेले रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच कोल्हापूर-सांगली राज्य मार्गावर बेकायदेशीरपणे मिडल ओपनिंग करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

शिरोली (कोल्हापूर)- सांगली रस्त्याचे चौपदरीकरण करणे या प्रकल्पांतर्गत सदर शिरोली ते बसवानखिंड किमी १४६/७९० ते १६६/६५० व अंकली ते सांगली किमी ७१/१३० ते ७५/८३० या भागात चौपदरीकरणाचा वाव अंतर्भूत आहे.

चौपदरीकरणांतर्गत मध्य दुभाजक बांधण्याचे काम ठिकठिकाणी प्रगतीत असल्याने काही ठिकाणी मध्य दुभाजकामध्ये छेद (Opening) राहिल्याचे दिसून येते.

तथापि स्थानिक व्यावसायिकांनी ९ ठिकाणी मध्य दुभाजक तोडून वाहनासाठी अनधिकृत वाहनमार्ग निर्माण केले आहेत. उद्योजकाकडून सदर अनधिकृत वाहन मार्ग (Opening) बंद करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

(३) यामुळे कोणतीही अपघाताची घटना घडलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) बसवानखिंड ते अंकली पूल या दरम्यान सुरु असलेले काम पूर्ण करणेबाबत विभागामार्फत उद्योजकाकडे पाठपुरावा सुरु आहे.

अनधिकृत वाहनमार्गातील छेद (Opening) बंद करणेच्या उद्योजकास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उमरखेड व महागाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(१८) * ७९८६४ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील अनेक रस्त्यांची या वर्षी पडलेल्या पावसामुळे दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावरील पूस नदीवरील पूलाला सन २०१६ या वर्षीच्या पावसाळ्यात खड्डे पडले असून ते अद्यापपर्यत बुजविण्यात आले नाही, तसेच महागाव शहरातील रस्ता दुरुस्तीच्या कामाकरिता विहिरीतील माती मिश्रीत मुरुम आणि दगडांची गिट्टी वापरली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच फुलसावंगी (ता.महागाव, जि.यवतमाळ) पासून ३ कि.मी. अंतरावर असलेल्या काळी टेंभी येथील पूला लगत असलेल्या खड्डयामुळे अनेक अपघात होत असल्याबाबतची तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबधित अधिकाऱ्यांकडे वारंवार करूनसुद्धा अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उमरखेड तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत, काळी टेंभी येथील पुलालगत असलेला खड्डा बुजविण्याबाबत, पूस नदीवरील पुलाला पडलेले खड्डे बुजविण्याबाबत तसेच महागाव तालुक्यातील रस्त्याच्या कामात निकृष्ट दर्जाच्या बांधकाम साहित्याचा वापर करणाऱ्या कंत्राटदार व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) प्रश्नांकित पूलाच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले आहे. तसेच महागांव शहरात कोणतेही मातीकामाचा समावेश असलेले काम प्रगतीत नाही.प्रस्तुत रस्ता व पूल राष्ट्रीय महामार्ग आहे. त्यामुळे या रस्त्याची दुरूस्ती व सुधारणा करण्याची कामे केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे.
(३) हे खरे नाही, रस्ता वाहतुकीसाठी सूरळीत व सुस्थितीत आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेमजई-भटाळा-आसाळा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) या रस्त्याच्या बांधकामातील गैरव्यवहाराबाबत

**(१९) * ८३१६४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेमजई-भटाळा-आसाळा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) या रस्त्याचे नविन बांधकाम हिंगणघाट येथील नामवंत कंत्राटदाराने सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वरोरा या कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाचे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता बांधकाम केल्यानंतर केवळ पंधरा दिवसातच पूर्णत: रहदारीस नादुरूस्त झाला असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदारावर व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बिलोली व देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातून वाहणाऱ्या मांजरा नदीपात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा होत असल्याबाबत

**(२०) * ८१६८१ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंजगाव, हुणगुंदा, माचनूर, सगरोळी, यसगी, कारला, नागणी (ता.बिलोली, जि.नांदेड) व सोनाळा, शेकापूर, शेळगाव, (ता.देगलूर, जि.नांदेड) या तेलंगणा व कर्नाटक राज्याच्या सिमेवरील गावातून वाहणाऱ्या मांजरा नदीपात्रातून प्रशासनाच्या संगणमताने व निष्काळजीपणामुळे दिवस-रात्र जे.सी.बी. मशीनच्या सहाय्याने अवैधपणे वाळू उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या तीसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध वाळू उपशामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर व त्यास मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) नांदेड जिल्ह्यातील बिलोली व देगलूर तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

नांदेड जिल्हयात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तालुका स्तरावर भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच अवैध रेती वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने चेकपोस्ट स्थापन करण्यात आले असून, तेथे २४ तास पथक कार्यरत ठेवण्यात आले आहे. एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत केलेल्या तपासणीमध्ये वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत देगलूर तालुक्यात १२६ प्रकरणांत रू. २६,६३,९७२/- व बिलोली तालुक्यात १४५ प्रकरणांत रू. ५१,२५,५००/- एवढा दंड वसूल केला आहे. तसेच देगलूर तालुक्यात ९ प्रकरणांत व बिलोली तालुक्यात ३९ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तथापि, प्रशासनाच्या संगनमताने व निष्काळजीपणामुळे वाळूचा उपसा होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंरोचा (जि.गडचिरोली) तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात अवैधरित्या रेतीचे उत्खन्न करून तेलंगणा राज्यात तस्करी करण्यात येत असल्याबाबत

**(२१) * ८३१७६ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंरोचा (जि.गडचिरोली) तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात नियमबाहय व अवैधरित्या जेसीबीच्या सहाय्याने दिवसरात्र रेतीचे उत्खन्न करून तेलंगणा राज्यात मोठया प्रमाणात रेतीची तस्करी करण्यात येत असल्याची तक्रार जिल्हा प्रशासन व आयुक्त, नागपूर यांच्याकडे लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी नदीपात्राच्या रेतीघाटावर दिंनाक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी रात्री ९.३० वाजता धाड टाकून क्षमतेपेक्षा जास्त रेतीने भरलेले २७ ट्रक, ४ जेसीबी, ४२ खाली ट्रक जप्त करण्यात येऊन फक्त ७ लाख रूपये दंड ठोठावून नाममात्र कार्यवाही करण्यात आल्याची माहिती दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग व परिवहण विभाग आणि रेती माफीया यांच्या संगनमताने तेलंगणा राज्यात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळूची तस्करी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गोदावरी नदीपात्रातील वाळूची तेलंगणा राज्यात होणारी तस्करी रोखण्याबाबत व उक्त प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशा आशयाची लोकप्रतिनिधी यांची दि. २३.०२.२०१७ रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे.

(२), (३), (४) व (५) उप विभागीय अधिकारी अहेरी व अपर पोलिस अधिक्षक, अहेरी यांनी महसूल व पोलिस विभागाच्या पथकासह मौजे वडदम या रेतीघाटावर दि. ११/०२/२०१७ रोजी रात्री ११.०० वाजता व मौजे नगरम-२ या रेतीघाटावर दि. १२/०२/२०१७ रोजी पहाटे २.३० वाजता धाडी टाकून बेकायदेशीर उत्खनन करून, रेतीने भरलेले एकूण २७ ट्रक, ४ जेसीबी व ४२ रिकामे ट्रक जप्त केले आहेत.

सदर २७ ट्रकमधील १३० ब्रास अवैध रेती साठ्याबाबत महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) नुसार बाजारभावाच्या ५ पट याप्रमाणे रू. ७,०२,०००/- एवढा दंड आकारून वसूल करण्यात आला असून, ४ जेसीबी मशिनींबाबत उपविभागीय अधिकारी, अहेरी यांच्या स्तरावर नियमानुसार कार्यवाही सुरू आहे. तसेच संबंधित वाळूघाट कंत्राटदारांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गोदावरी नदीपात्रातील वाळूची तेलंगणा राज्यात होणारी तस्करी रोखण्याकरीता गोदावरी नदीवरील आंतरराज्यीय पुलाजवळ CCTV युक्त तपासणी नाका स्थापन केला आहे. सदर नाक्यावर वाळूची अवैध वाहतूक करताना आढळून आलेल्या ६२ वाहनांवर कारवाई करून रू. १९,३५,९६६/- एवढा दंड वसूल करून शासनजमा करण्यात आलेला आहे.

जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग व परिवहन विभागाच्या संगनमताने तेलंगणा राज्यात अनधिकृतरित्या वाळूची तस्करी केली जात असल्याचे निदर्शनास आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांची फलोरक्लोरमेन्युरॉन या बनावट कंपनीच्या औषधांमुळे झालेली फसवणूक**

**(२२) * ७९९७८ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात फलोरक्लोरमेन्युरॉन या बनावट कंपनीच्या औषधांची अवैधरित्या विक्री सुरू असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार या बनावट कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) व (३) पी.एन.पी. असोसिएटस् कंपनीच्या बनावट फलोरक्लोरमेन्युरॅान (सिटोफेक्स) या कीटकनाशकाची विक्री करून शेतक-यांची फसवणूक केल्याबाबत एका व्यक्तीविरूद्ध देवळाली कॅम्प पोलिस स्टेशन मध्ये गु.नों.क्र.८७/२०१६ दि. १०.१२.२०१६ रोजी दाखल करण्यात आलेला असून सदर व्यक्तीस अटक करण्यात आलेली आहे.

श्री श्रीमंत ॲग्रो सर्व्हिसेस,नानेगांव, जि.नाशिक यांच्या विक्री केंद्रातील शिल्लक संशयास्पद ४ लीटर सिटोफेक्सचा साठा जप्त करण्यात आलेला असून विक्री केंद्राचा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील अनधिकृत गोदामे निष्कासीत करण्याबाबत**

**(२३) * ७८८६४ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लोनाड (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र. ११, हिस्सा क्र. १, ३ व ५ या जागेतील ग्रामस्थांच्या वहिवाटीतील वडिलोपार्जित जागेत श्री.कमलेश सदाभाई पटेल यांनी मोठी गोदामे बांधून रस्ता बंद केल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधी, तहसिलदार, भिवंडी, उपविभागीय अधिकारी, भिवंडी, पोलीस निरिक्षक, भिवंडी यांच्याकडे दिनांक ८ ऑक्टोबर, २०१२ व दिनांक २३ जुलै, २०१३ रोजी तसेच माहे जुलै, २०१४, माहे जानेवारी, २०१५ व माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे राहनाळ अंजूर, दिवा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे व शहापूर-नाशिक महामार्गावर मोठ्या प्रमाणात अनधिकृत गोदाम बांधकामे होत असल्याचेही माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर अनधिकृत गोदामे निष्कासीत करण्याबाबत व सदर अनधिकृत गोदामे बांधणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे लोनाड, ता.भिवंडी येथील स.नं. ११/१ व इतर या जागेत बांधकाम करुन रस्ता बंद केल्याबाबतच्या तक्रारीची काही निवेदने प्राप्त झालेली आहेत.

मौजे लोनाड (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथील सर्व्हे क्र. ११, हिस्सा क्र. १, ३ व ५ या मिळकतीमधून असलेला वहिवाटीचा रस्ता पूर्ववत करावा यासाठी श्री.रघुनाथ कानू पाटील व इतर यांनी तहसिलदार, भिवंडी यांच्या न्यायालयात मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ अन्वये दावा दाखल केला होता. सदर दावा तहसिलदार, भिवंडी यांनी दि.०२/०७/२०१३ च्या आदेशान्वये फेटाळला आहे.

शहापूर-नाशिक महामार्गालगत मौजे वालशिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. १७/१ व १९/१ या सरकारी जमिनीवर संबंधितांनी अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने सदर अतिक्रमणे दि.०८/०१/२०१६ रोजी निष्कासित केली आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या मौजे राहनाळ, अंजूर व दिवे अंजूर, ता.भिवंडी या गावांमधील एकूण ५८ अनधिकृत गोदामांच्या बांधकाम प्रकरणी प्राधिकरणाकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या असून ४ प्रकरणी दखलपात्र गुन्हे दाखल केले आहेत.

-----------------

## दापोली ते पालगड (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(२४) * ८१५०२ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली ते पालगड (ता.दापोली, जि.रत्नागिरी) हा १८ कि.मी.लांबीचा रस्ता दापोली, मुरुड, कर्दे, आंजर्ले-केळशी आडे इत्यादी निसर्गरम्य पर्यटन स्थळांना जोडणारा तसेच मुंबई व पुणे येथून येणाऱ्या पर्यटकांकरीता अत्यंत महत्वाचा असतानाही अनेक वर्षापासून नादुरुस्त होऊन वाहतूकीस धोक्याचा झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करून रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) विषयांकित रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग खराब झाला आहे.

(२) होय.

(३) व (४) विषयांकित रस्त्याची सुधारणा करण्याचे काम निकष, मंजुरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**पुणे-कोलाड (ता.मुळशी, जि.पुणे) या रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत**

**(२५) * ८१५५१ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-कोलाड (ता.मुळशी, जि.पुणे) रस्त्याच्या साइडपट्टया अनेक ठिकाणी उखडल्या असल्याने या अरुंद रस्त्यावरुन वाहतूक करणे धोकादायक झाल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर भूगांव, भुकूम, पिरंगुट या ग्रामपंचायती मुळशी शहरालगतच्या असल्याने व या गांवाचे शहरीकरण झपाटयाने होत असल्याने या अरुंद रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असून दरदिवशी अदांजे दहा हजार वाहने प्रवास करत असल्याने सदर रस्ता खचण्याचा, दबण्याचा धोका निर्माण झाला असल्याने संबंधित ग्रामपंचायतींनी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळवूनही आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती तसेच रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१६ च्या पावसाळ्यात रस्त्याच्या बाजूपट्या काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाल्या होत्या. त्या दुरुस्त करुन घेण्यात आल्या आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

-----------------

## मौजे उमरकांचन (ता.पाटण, जि.सातारा) गावातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२६) * ७४९६६ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत ढेबेवाडी खोऱ्यात सन १९९७-९८ ला वांग-मराठवाडी धरणप्रकल्प साकारण्यास सुरुवात झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प साकारताना या धरणप्रकल्पामध्ये मौजे उमरकांचन व जिंती ही गांवे पूर्णतः बाधित झाली असून धरणात पाणीसाठा केल्यानंतर उमरकांचन गांवातील ६२ कुटुंबांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणाचे काम सुरु होवून १९ वर्ष झाली तरी उमरकांचन गावातील पूर्णतः बाधित धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उमरकांचन गांवातील पूर्णतः बाधित ६२ कुटुंबांनी सांगली जिल्हातील तडसर (ता.कडेगांव) याठिकाणी उपलब्ध असणारी २६६ एकर गायरान जमीनीपैकी पुनर्वसनाकरिता आवश्यक असणारी केवळ १४० एकर गायरान जमीन मिळणेबाबत शासनाकडे व सांगली जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) वांग मराठवाडी प्रकल्पामुळे बाधित मौजे उमरकांचन, मेंढ, घोटील, रेठरेकरवाडी, केकतवाडी, निगडे व जिंती येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन सांगली जिल्हयामध्ये करण्याचे नियोजन आहे. मौजे उमरकांचन येथील एकूण ४७२ प्रकल्पग्रस्तांपैकी २२ अंशत: बाधित व २८० पूर्णत: बाधित अशा ३०२ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे. तथापि, ५३ प्रकल्पग्रस्तांनी मौजे तडसर, ता. कडेगांव, जि. सांगली येथील गायरान जमीन

मिळण्याबाबत उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे सर्व्हेक्षण उपविभाग, कराड यांचेकडे लेखी अर्जाद्वारे मागणी केली आहे.

(५) वांग मराठवाडी प्रकल्पाने बाधितांपैकी उर्वरित १७० प्रकल्पग्रस्तांना नियोजन आराखडयानुसार पर्यायी जमीन वाटपासाठी उपलब्ध असलेल्या शिल्लक जमिनीमधून प्रकल्पग्रस्तांचे पसंतीनुसार जमीन वाटपाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२७) * ७८६९७ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जांभुळवाडी ते लिंगनूर व नेसरी ते राज्याच्या हद्दी पर्यंतच्या रस्त्याची (ग्रामा २९) गत १० वर्षात दुरुस्ती झाली नसून सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी व त्यासुमारास अनेकवेळा कार्यकारी अभियंता यांचेकडे करुनही सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मौजे चव्हाणवाडी (भडगाव) (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे योग्य प्रकारचा पक्का रस्ता नसल्याने पावसाळयात विद्यार्थ्यांना शाळेत जाताना चिखलातून चालत जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कोल्हापूर जिल्हयातील प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ६३ वरील विहिरीस संरक्षक कठडे बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ मे, २०१४ रोजी व त्यानंतर अनेकवेळा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांचेकडे करुनही विहिरीस संरक्षक कठडे बांधण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत व विहिरीस संरक्षक कठडे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) निवेदन प्राप्त आहे हे खरे आहे. तथापि खात्याच्या मैल कामगार यांच्याकडून रस्ता किरकोळ दुरुस्ती करुन वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे.

तसेच सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधून २.६५० ते २.९८० कि.मी. लांबीमध्ये बी.बी.एम.सह डांबरीकरणाचे काम मंजूर आहे.

(२) मौजे चव्हाणवाडी (भडगांव) हा रस्ता योजनाबाहय असल्याने रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सदर रस्त्याचे काम घेता येत नाही. तथापि मा.आमदार/खासदार/लोकप्रतिनिधी यांनी सदर रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजना, स्थानिक विकास कार्यक्रम इ. कार्यक्रमांमधून सुचविल्यास व त्यास मंजूरी मिळाल्यास या रस्त्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत करता येईल.

(३) सदर मागणी असलेले पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त नाही. तथापि प्रमुख जिल्हा मार्ग ६३ वरील १०/५०० व १०/६०० कि.मी. मधील दोन विहिरींच्या बाजुला रस्त्याच्या कडेस संरक्षक कठडे बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण करण्यात आलेले आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड व चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील डुबी नदीवर, धामणंद येथील नदीवर व कापशी नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत

**(२८) * ७४६०२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खोपी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील डुबी नदीवर ७५ वर्षांपूर्वी बांधलेल्या पुलाने धामणंद, पंधरागांव, रघुवीर घाट, शिरगांव, कुंभाड, शिंदी, वळवण इत्यादी २५ गावे जोडली गेली असून सदर पूल कालबाहय झाल्याने धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे धामणंद (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील नदीवर ६५ वर्षांपूर्वी बांधलेला पूल मौजे चिरणी, भेलसई, शेल्डी, काडवली, कुंभवली, धामणंद, पोसरे, साखर, कासई, कुरवल जावळी, वावे, निवे, चोरवणे, तळवटपाल, सापिर्ली या पंधरा गावांना जोडणारा असून सदर पुलाच्या पिलरचे बांधकाम कोसळू लागल्याने धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मौजे सावर्डे-भुवडवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील कापशी नदीवर लोखंडी साकव जिर्ण झाल्याने अत्यंत धोकादायक बनला असून त्यावरून जाताना सिमेंट प्लेट तुटून एक तरूण नदीमध्ये पडून गंभीररित्या जखमी झाल्याची घटना दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी घडल्याने या ठिकाणी पूल बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आणि ग्रामस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पुलांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने डुबी नदीवर, धामणंद येथील नदीवर व कापशी नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) निवेदन अथवा मागणी प्राप्त झाल्याची आढळून येत नाही.

(४), (५) व (६) विषयांकित डुबी नदीवरील पूल आणि धामणंद नदीवरील पूल बांधण्याचे काम निकष, मंजूरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

कापशी नदीवरील साकव जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे अखत्यारितील असून साकव दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत साकव दुरुस्तीचे काम मंजूर आहे.

-----------------

**कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील वारूळ, मलकापूर-शाहुवाडी व पणुंद्रे-शिंदेवाडी येथील नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत**

**(२९) * ७६३६३ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-रत्नागिरी या महामार्गावरील वारूळ येथील १२५ वर्षे जुना एस आकाराचा पूल व मलकापूर-शाहुवाडी येथील १३० वर्षे जुना पुल कालबाह्य झाला असून सदर पुलाच्या संरक्षक कठड्याची दुरवस्था व पुलावर झाडाझुडपांची झालेली वाढ यामुळे पूल वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पणुंद्रे-शिंदेवाडी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील नदीवरील पूल अतिवृष्टीमुळे वाहून गेल्याने वाहतूक पूर्णपणे बंद असून ग्रामस्थ, कामगार वर्ग व विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुलांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील वारूळ, मलकापूर-शाहुवाडी व पणुंद्रे-शिंदेवाडी नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील कि.मी. ८३/८०० मधील वारुळ आणि कि.मी. ९२/५०० मधील मलकापूर ह्या दोन्ही दगडी बांधकामातील कमानी पुलांवरील झाडे-झुडपे वेळोवेळी काढण्याची कार्यवाही करण्यात येत असून वारुळ येथील पुलावरील दगडी बांधकामातील कमी उंचीच्या क्षतिग्रस्त कठड्यांची दुरुस्ती करुन जास्त उंचीचे पाईप रेलींग बसविण्यात आले आहेत.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

संदर्भाधीन इजिमा १७९ वर विशेष प्रकल्प विभाग कोल्हापूर यांचेमार्फत विशेष घटक योजनेमधून पणुंद्रे -शिंदेवाडी येथील ओढयावरील १० पाइप रांगांच्या निर्गम सेतूचे (साकव) बांधकाम प्रगतीत असताना सन २०१६ च्या पावसाळयात अतिवृष्टीमध्ये अपूर्णावस्थेतील पोहोच मार्गाचे काम मातीकाम वाहून गेले असल्याने काही कालावधीसाठी वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. पावसाळयानंतर पोहोच मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर निर्गम सेतूवरुन वाहतूक पूर्ववत सुरु करण्यात आली आहे. रिटर्न वॉल व पोचमार्गासह साकवचे बांधकाम पावसाळयापूर्वी पूर्ण होणे अपेक्षित असून त्यानंतर साकव देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

(४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत कोल्हापूर रत्नागिरी महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून त्यामध्ये वारुळ येथे नवीन पुलाचे बांधकाम तर मलकापूर गावासाठी बाह्यवळण रस्ता प्रस्तावित केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील वैतरणा, तानसा व पिंजाळ नदीपात्रात अवैध रेती उपसा होत असल्याबाबत**

**(३०) * ८२६१६ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील वैतरणा, तानसा व पिंजाळ नदीपात्रात वाळूमाफिया अवैधपणे रेती उपसा करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध रेती उपशामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध रेती उपसा करणाऱ्या वाळूमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे पिक (ता. वाडा) येथील ग्रामस्थांचे दि. ३/०१/२०१७ रोजीचे वाडा व मलवाडा गावाच्या हद्दीतील पिंजाळ नदीतील अनधिकृत रेती उपसा रोखण्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी पालघर यांना प्राप्त झाले होते. तसेच याच विषयाबाबत दि.०३/०१/२०१७ रोजी एका वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर निवेदनाच्या / बातमीच्या अनुषंगाने वाडा व विक्रमगड तहसिल कार्यालयाच्या संयुक्त पथकाकडून पिक व मलवाडा हद्दीतील पिंजाळ नदीपात्रात दि.१७/०२/२०१७ रोजी तपासणी करून रेती उपसा करणाऱ्या आठ पत्राहोडी पकडण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना मका पिकाचे प्रलंबित अनुदान मिळण्याबाबत

**(३१) * ७९६४५ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात खरीप हंगामात मका पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शासनाने अनुदान जाहीर केले असून अद्यापही येथील ७७ गावातील २ हजार ७१२ शेतकरी प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मका अनुदानापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना मका अनुदानातंर्गत १ कोटी १० लाख ९२५ रुपये मिळणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करून उक्त शेतकऱ्यांना थकीत अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील प्रादेशिक परिवहन आगारातील एस.टी. बस चालकाचा रिक्षा चालकाच्या मारहाणीत झालेला मृत्यु

**(३२) * ८२९७४ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील प्रादेशिक परिवहन आगारात एस.टी. बस आत शिरताना रिक्षाला धक्का लागला या क्षुल्लक कारणासाठी रिक्षा चालकाने केलेल्या मारहाणीत एस.टी. बस चालकाचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार एस.टी.बस चालकास मारहाण करणाऱ्या रिक्षा चालकावर कारवाई करण्याबाबत तसेच मृत एस.टी.बस चालकाच्या कुटुंबांतील एका व्यक्तीस नोकरी व अर्थसहाय्य देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) दि.९.२.२०१७ रोजी रिक्षाचालक व राज्य परिवहन चालक यांच्यात वादविवाद झालेला होता. परंतु राज्य परिवहन चालकाचा मृत्यु हा रिक्षाचालकाच्या मारहाणीत झालेला नसून वैद्यकीय अहवालानुसार हृदयविकाराच्या झटक्याने झालेला आहे.

(२) व (३) भिवंडी निजामपूर पोलीस स्टेशनमध्ये दि.९.२.२०१७ रोजी गुन्हा नोंद केलेला आहे.

राज्य परिवहन चालकाच्या कुटुंबास भविष्य निर्वाह निधीची रक्कम रु.३७,९४३/- व उपदान रक्कम रु.२,४३,९६४/- तसेच अंत्यविधीसाठी रु.५,०००/- तसेच मृत्यु सहाय्य योजनेअंतर्गत रु.१ लाख देण्यात आले आहेत. राज्य परिवहन चालकाच्या पत्नीस अनुकंपा तत्वावर रिक्त असलेल्या वाहक पदावर सामावून घेण्यासाठी तसा अर्ज करण्याबाबत सांगण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील खडकपुर्णा नदीवरील राहेरी व लोणार-गायखडे मार्गावरील दगडी पूलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३३) * ७९९८९ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे राज्य महामार्ग क्र.१२ वरील सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील खडकपूर्णा नदीवरील राहेरी या पूलाच्या चार क्रमांकाच्या पिल्लरच्या दोन्ही बेअरिंग निकामी झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलावरुन जड वाहतुक बंद करण्यात आल्याने नागपूरला जाणारी जड वाहतूक देऊळगांव राजा मार्गे चिखली-खामगांव महामार्गावर वळविण्यात आली असून सदर मार्ग हा एकेरी असल्याने अपघाताचे प्रमाणही वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, लोणार ते गायखेड मार्गावरील (जि.बुलढाणा) दगडी पूल अत्यंत धोकादायक झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार खडकपूर्णा नदीवरील राहेरी पुलाची, लोणार ते गायखेड मार्गावरील दगडी पूलाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच चिखली-खामगांव या महामार्गाच्या दुपदरीकरणाचे रखडलेले काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय हे खरे आहे.

पूल जड वाहनांच्या वाहतूकीसाठी बंद करण्यात आला आहे.

(२) नाही.

प्रश्नांकित पूल व चिखली-खामगांव रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषीत करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत जड वाहतुक ही मुंबई कडे जाण्यासाठी मेहकर-चिखली-देऊळ गांव राजा जालना व नागपूर कडे जाण्यासाठी जालना-चिखली-खामगांव मार्गे वळविण्यात आली आहे. वाहतूक वळविल्यामुळे रस्त्यावरील अपघाताच्या संख्येत वाढ झाली नसल्याचे पोलीस अहवालावरुन दिसून येते

(३) व (४) नाही.

प्रश्नांकित ठिकाणी पूल नाही. या ठिकाणी जि. प. बुलढाणा यांच्या अखत्यारितील लोणार ते हिरवड या इजिमा-१४५वर कि. मी. ३/७०० मध्ये दगडी पेव्हमेंट आहे. पेव्हमेंट मधील काही दगडी परशी क्षतीग्रस्त झाली होती. ती दुरूस्त करून वाहतुक सूरळीत सूरू आहे.

(५) व (६) राहेरी पूलाच्या पुनर्बांधणीच्या निविदा केंद्र शासनामार्फत बोलविण्यात आल्या आहेत. चिखली-खामगांव रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम केंद्रशासनाच्या अखत्यारित असून त्याच्या मार्फत कार्यवाही होणे अपेक्षित आहे. लोणार ते गायखेड मार्गावरील दगडी पेव्हमेंट जि. प. बुलढाणा यांनी दुरुस्त केले आहे.

-----------------

## भुईगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील शासकीय जमिनीवरील तिवरांची झाडे तोडून बेकायदा बांधकामे व कोळंबी प्रकल्प उभारल्याबाबत

**(३४)** * **८३०३४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुईगाव (ता.वसई, जि.पालघर) येथील सरकारी जमिनीवरील तिवरांची झाडे तोडून उभारलेली बेकायदा बांधकामे व कोळंबी प्रकल्प पाडून टाकण्याचे आदेश ७ महिण्यांपूर्वी उच्च न्यायालयाने दिले असतानाही महसूल विभागाने कोणतीही कारवाई केली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) पालघर जिल्ह्यातील मौजे भुईगाव ता.वसई येथील सर्व्हे नं १६३, व स.नं.२२० या सरकारी खाजण जमिनीवर अनधिकृतपणे भराव करुन रस्ता तयार केल्याचे व स.नं.१६४ व स.नं.२२० या सरकारी खाजण जमिनीवर काही प्रमाणात अनधिकृत बांधकाम केल्याचे आढळून आले असून स.नं.१६३ व २२० मधील अनधिकृत रस्ता निष्कासित करण्यात आला आहे. मा.उच्च न्यायालय मुंबई येथे राज्यातील पाणथळ जागेचे संरक्षण करण्याच्या अनुषंगाने दाखल एका जनहित याचिके मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २१/८/२०१४ च्या आदेशाच्या अनुषंगाने पाणथळ जागांवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी उप विभागीय अधिकारी, वसई यांचे मार्फत पथक निर्मिती करण्यात आली असून या पथकांमार्फत उक्त सर्व्हे नंबर मधील

अनधिकृत रस्त्याचे निष्कासन करण्यात आले आहे. मात्र सर्व्हे नं.१६४ मधील ३८'x२५' क्षेत्राचे पक्क्या बांधकामावर कारवाई करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे बांधकाम दूर करता आले नाही. तसेच सर्व्हे नंबर २२० मधील अनधिकृत बांधकामासंदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५०(३) अन्वये तहसिलदार वसई यांनी बजावलेल्या नोटीशीविरोधात संबंधितांनी दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), वसई येथे दावा दाखल केला असून न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले असल्याने अनधिकृत बांधकाम निष्कासित करता आलेले नाही. मात्र उक्त सर्व्हे नं.मधील तिवरांची झाडे नष्ट केल्याबाबत संबंधितांविरुध्द पर्यावरण कायदा १९८६ च्या तरतूदी अन्वये वसई पोलिस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

----------------

## सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे निकृष्ट तुर बियाणांमुळे झालेले नुकसान

**(३५) * ७७७८८ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाशी संलग्न असणाऱ्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन (आत्मा) यांचे माध्यमातुन सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना एक हजार एकर क्षेत्राकरिता वितरीत करण्यात आलेले संशोधित २७४० हे तुर बियाणे निकृष्ट दर्जाचे असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संशोधित बियाणे असल्याने शेतकऱ्यांना एकरी दहा ते पंधरा हजार रूपये खर्च आला असुन अंदाजित केलेला कालावधी उलटून गेल्यानंतर काही ठिकाणी नुसती फुले तर काही ठिकाणी लहान शेंगा लागल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सोलापूर जिल्हयाच्या माढा तालुक्यातील रिधोरे, तांदुळवाडी या गावांसह बार्शी, अक्कलकोट व मोहोळ या तालुक्यांसह जिल्हयातील सर्व तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर हैद्राबाद येथील पथकाने पाहणी केली तसेच कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन (आत्मा) कार्यालयाने कृषी विभागाला अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, अंशत: खरे आहे, आयसीपीएच २७४० या संकरीत वाणाचे सोलापूर जिल्ह्यात १००० प्रात्यक्षिके घेण्यात आली आहेत. त्यापैकी २६ गावातील एकुण १८३ शेतक-यांच्या लेखी स्वरुपात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) होय.

(३) होय, प्राप्त तक्रारीनुसार इक्रिसॅटचे शास्त्रज्ञ यांनी दि. १७/०१/२०१७ रोजी भेट देऊन पाहणी केली असून पाहणीचे निष्कर्ष कळविले आहेत.

(४) शासनाने गठीत केलेल्या उपविभागीय कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील तक्रार निवारण समितीने पाहणी केली आहे. उत्पन्नाची आकडेवारी अद्याप प्रलंबित असुन तक्रार निवारण समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील धरमतर खाडीपात्रात अवैध वाळूचे उत्खनन होत असल्याबाबत

**(३६) * ८००३० श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील धरमतर खाडीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन होत असल्यामुळे खाडीच्या पात्राला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) रायगड जिल्हयातील धरमतर खाडीपात्र अलिबाग व पेण तालुक्यात येत असून, सदर खाडीपात्रामध्ये उपविभागीय अधिकारी अलिबाग व उपविभागीय अधिकारी पेण यांनी नोव्हेंबर २०१६ ते मार्च, २०१७ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत वेळोवेळी तपासण्या केल्या आहेत.

सदर तपासणीत वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याचे आढळून आल्यानुसार एकूण ५४.५ ब्रास वाळू, ३ बार्ज, ३ सक्शनपंप व २ ट्रक जप्त करण्यात आले आहेत. तसेच एका प्रकरणात ५ ब्रास वाळूच्या अवैध साठ्याबाबत संबंधितांविरूध्द दंडात्मक कारवाई करून रू. १,०८,६२५/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ३ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या वाळूसाठ्यापैकी ५१.५ ब्रास वाळूचा लिलाव करण्यात आला असून, त्यापासून प्राप्त रक्कम रू. ३,०९,३२५/- शासनजमा करण्यात आली आहे.

रायगड जिल्हयात वाळूच्या अनधिकृत उत्खनन व वाहतुकीवर प्रतिबंध घालण्याकरीता धरमतर खाडीजवळील मौजे वडखळ व जिल्हयातील मोक्याच्या ठिकाणी २४ तास तपासणी नाके कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

तथापि, धरमतर खाडीपात्राला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील बागायतदारांना फळ पिकांचे अनुदान न मिळाल्याबाबत

**(३७) * ८१६८८ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील बागायतदार शेतकऱ्यांना सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील कोरडवाहू पिकांसाठी अनुदान वाटप करण्यात आले असून बागायतदार शेतकरी संख्या ६११९८ असून प्रशासनाकडून शासनाकडे ५५ कोटी रूपयांची मागणी केली असल्याने व बागायतदार फळपिक अनुदान प्रशासनाकडे उपलब्ध होवूनसुध्दा शेतकऱ्यांना अदयाप पर्यंत अनुदान मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने अनुदान न मिळण्यास जबाबदार असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व सदरहू शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

बहुवार्षिक फळपिके व बागायती पिकांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३८) * ८१५४० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील महाड-लाटवण-विसापूर-दापोली-उंबरघर, दापोली-वाकवली-साखरोली रा.मा.१६२, आवाशी-हातिप-सोंडेघर प्रजिमा ५, वणौशी-अगरवायंगणी-पन्हाळेकाजी-फणसू-कोरेगाव रस्ता प्रजिमा १३, उन्हवरे-गोविंदशेत-पांगारी, अडखळ-पाज-सालदुरे-कर्दे-लाडघर या रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामासाठी अंदाजे ६.६० कोटी रुपयांची आवश्यकता असून सदर निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकित रस्त्यांवर प्रगतीपथावर असलेल्या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध आहे. तसेच या रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले आहेत. वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) निवेदनातील नमूद रस्त्यांच्या क्षतिग्रस्त भागात काही सुधारणा व नूतनीकरणाची तसेच अन्य कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी, निकष, निधी व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.